महाराष्ट्र शासन
**पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर,**
मिल कॉर्नर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, छत्रपती संभाजीनगर-431001.
दुरध्वनी क्रमांक 0240-2240591,फॅक्स क्र.0240-2240596
ई मेल :- cp.aurangabad@mahapolice.gov.in

क्र.कक्ष-१०/पो.शि/भरती-प्रेसनोट/२०२४/ छत्रपती संभाजीनगर, दिनांक २४.०७.२०२४

# प्रेस नोट

पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर आस्थापनेवरील २१२ रिक्त पोलीस शिपाई पदांकरीता दि. १९.०६.२०२४ ते २६.०६.२०२४ या कालावधीत शारीरिक मोजमाप व मैदानी चाचणी ची प्रक्रिया विभागीय क्रिडा संकुल, सुतगिरणी चौक, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर येथील मैदानावर पार पडली आहे. सदर २१२ रिक्त पदांमध्ये बॅन्डसमन पोलीस शिपाई यांची ८ पदे आहेत. सदरच्या पोलीस शिपाई बॅन्डसमन पदाकरिता २००३ उमेदवारांनी आवेदन अर्ज सादर केलेले होते. त्यापैकी ९५२ उमेदवार मैदानी चाचणी करिता हजर होते. मैदानी चाचणी मध्ये ५०% गुण मिळविणाऱ्या उमेदवारांना बॅन्डसमन पदांसाठी संगीत कौशल्य किमान अर्हता चाचणीसाठी बोलावले होते. त्यामध्ये ५०% गुण घेणे आवश्यक होते. ६३१ पैकी ४५ उमेदवार ५०% गुण घेवुन लेखी परीक्षेसाठी पात्र झाले. अर्हता चाचणीमध्ये उत्तीर्ण झालेल्या ४५ उमेदवारांची पोलीस शिपाई बॅण्डस्मन पदाची लेखी परीक्षा दि. २४.७.२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजता पोलीस आयुक्त कार्यालयातील सभागृहामध्ये आयोजित करण्यात आली होती. सदर पैकी ४४ उमेदवार हजर होते. ०१ उमेदवार गैरहजर होते.

सदर परीक्षेची उत्तरपत्रिका ही वेबसाईटवर जाहीर करुन त्याचेवर काही आक्षेप असेल तर त्यांचे निरसन करुन उमेदवारांचे गुण प्रदर्शित केले जातील. त्यानंतर पोलीस शिपाई व बॅन्डसमन यांची एकत्रितपणे अंतरिम निवडसुची तयार करुन कागदपत्राची पडताळणी केली जाईल.

मा.प्रविण पवार, पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली प्रक्रिया शांततेत पार पडली. परीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार आढळुन आला नाही. उमेदवारांनी कोणत्याही भुलथापाला व प्रलोभनाला बळी पडु नये असे आवाहन मा.पोलीस आयुक्त प्रविण पवार यांनी केले आहे.

पोलीस शिपाई बँण्डस्मन पदाची लेखी परिक्षा अत्यंत सुरळीत पार पडली आहे.

**( शिलवंत नांदेडकर )**
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर.